ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# पेशवे काळातील मध्यपान आणि शासन व्यवस्था १६३० ते १८१८

**प्रा.डॉ.पाटोळे डी.एन**
**इतिहास विभाग प्रमुख , बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय**
**अनगर.ता.मोहोळ. जि.सोलापूर.**

**प्रस्तावना :-**

पेशवे काळातील मध्यपान या विषया बाबत विचारणा केल्यास आपणाला या काळात मध्यपान दारू पिण्याचे मोठया प्रमाणात केल्याचे दिसते.याकाळात दारू विकणाऱ्याना कलाल असे म्हटले जात असे पेशवे काळात दारू बनवण्याचे काम अनेक लोक करतहोते.पण त्यांची विक्री कलाल लोक करत असे पेशवे काळात दारू बनविण्याचे काम अनेक लोक करतहोते. पण त्यांची विक्री कलाल लोक करत असे शिवकाळात द्राक्षापासूनतसेच मोहापासून दारूतयार करीत दारूची दुकाने अतिशय कमी असे अशा दुकानावर सरकार अधिकारी व कोतवाल यांचे नियंत्रन असे एका गावात किंवा दोनते चार गावामध्ये मिळून पण गावाच्या बाहेर कलाल दारूविक्री करत असत[१]

पेशवे काळात दारू पिण्याची परवानगी होती. परंतू जर कोणी व्यक्ती दारू पिऊन धुंदझालेली व रत्यात दिसल्यास त्यांना पेशवे काळात(सरकार) मोठे शासन करतहोते[२] शिव काळात दारू पिण्यापासून लोकांना परावृत्त केले.तसेच पिणाऱ्यावर दंडाची व जाहिर फटके मारण्याची शिक्षा करण्यासाठी राजाकडूनहुकूम काढलेहोते[३]

परंतू पैसा मिळविण्यासाठी चोरून दारूचासाठा करणे व विकणे चालत होते. चोरूनसाठा करणारे व विकणारे यांच्यावर नियंत्रन ठेवण्यासाठी नाना फडनवीस यांनी अधिकाऱ्यांची नेमणूक केलीहोती.सन १७७६ मध्ये नारायण पेठेत एका द्राविड घरी दारूने भरलेले वीस पिपे व शिजवलेले मासे मिळालेहोते.ते जप्त करून कठोर शासन केले.[४]

मध्यपान करणाऱ्यावर पेशवे काळात कटाक्षहोता. जुन्नर या ठिकाणी बालाजी धोंडदेव कुलकर्णीहा मध्यपान करण्यास प्रसिध्द होता.त्याला ब्रम्हणसमाजाने दूर ठेवले व शिक्षा केली.[५]

पेशव्याच्या काळात दारू विकूनये असा शासनाचा दंडकहोता. जे ब्राम्हण दारू विकत होते. त्यांना किल्ल्यावर अटक करीत असत. नाशिक येथे ब्राम्हण मंडळी मध्यपान करतातहे जेव्हा सवाई माधवरावाला कळाले तेव्हा त्यांची चौकशी करण्यासाठीशंकर नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. गुन्हेगार ब्रम्हणांना अटक करून मुलहेर या किल्यावर रवानगी केली.[६]

पेशवे काळात पाटील कुलकर्णी यांनी दारू पिऊनये असा आदेश असे कसबे तासगाव येथील पाटलांच्या घरी दारूसापडली तेव्हा त्यांनी दहाहजार दंड दयावा असा आदेश सवाई माधवराव यांनी दिला. १७८७ मध्ये कोतवाल दारू पिला तेव्हा त्यांच्याकडून दहाहजार दंड वसूल केला.राघो नारायण या ब्राम्हणाने दारू प्राशन केलीहोती.त्या वेळी जेवणाच्या पंगतीततो बसलेला होता. तेव्हा सर्व ब्राम्हणसमुदयाने त्यांला प्रायश्चित घेण्यास सांगीतले.[७]

यावरून आपणाला पेशवे सरकारने सर्व समाजातील लोंकाना मध्यपान दारू करणा.यांना शासन किल्याचे दिसते.व दारू पिण्यावर बंदी घातलीहोती.हे दिसते.

**संदर्भ सुची :-**

१.पेशवाच्या सावलीत पान.४० चाफेकर
२.कित्ता पान.४१
३.सवाई माधवराव रोजनिशी भाग.३ पान.१२०
४.पेशवे दप्तर लेख.१४४

५.पेशवे दप्तर लेख.१४५
६.सवाई माधवराव रोजनिशी भाग.३ पान.१२२
७. कित्ता पान.१२३